जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2022
तरुण भारत

# 'स्तुती'मुळे विद्यापीठ जगभर गाजणार

## अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्रप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांची माहिती

प्रतिनिधी

कोल्हापूर

स्तुती उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठातील अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र (DST SAIF CFC) ला सुमारे अडीच कोटी मंजूर झाले आहेत. देशातील २८ राज्यांपैकी महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान, झारखंड राज्यांत तर ८ केंद्रशासित प्रदेशांपैकी दिल्ली आणि चंदीगड या दोन ठिकाणी या उपक्रमाला निधी मिळाला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सहयोगाने या प्रकल्पाकरिता १४ विविध संस्थांनी स्तुती कार्यक्रम घेण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे विद्यापीठाचे नाव देशभर जाईल. अथक प्रयत्नाने हा प्रकल्प मंजूर झाला आहे, अशी माहिती डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठाच्या अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्रातर्फे आपत्कालीन अभ्यासक्रम, कार्यशाळा, विविध उपकरणे आणि विश्लेषणात्मक तंत्राबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी स्तुती उपक्रम सुरू केला आहे. स्तुती योजने अंतर्गत शैक्षणिक संस्थांमधील संशोधन विकास, सुविधांचा विस्तार केला जातो. सात दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रत्येक विद्यापीठ/शैक्षणिक संस्थांना शिवाजी विद्यापीठामार्फत जवळपास ८ लाख ८३ हजार ५०० रुपये हस्तांतरित केले जाणार आहेत.

प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी अध्यापनातील २४ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी अनेक विद्यापीठ व वैज्ञानिक संघटनांमध्ये वैविध्यपूर्ण कार्य केले आहे. या अनुभवाचा फायदा 'स्तुती' उपक्रमासाठी होत आहे. याच्या उद्घाटनप्रसंगी देशभरातील शास्त्रज्ञ, मंत्री, सचिव उपस्थित राहणार आहेत.

> विद्यापीठाच्या जडणघडणीत सर्व कुलगुरू, प्राध्यापक, कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थ्यांचे योगदान आहे. 'स्तुती' उपक्रमासाठी विविध आयआयटी, केंद्रीय व राज्य विद्यापीठांकडून स्वीकृती मिळणे ही सन्मानाची गोष्ट आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### स्तुती प्रशिक्षण उपक्रमाचे वेळापत्रक

काश्मीर विद्यापीठात २३ ते २९ मे, वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ४ ते १० जुलै, आय.आय.टी. जोधपूर येथे ८ ते १४ ऑगस्ट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, केंद्रीय विद्यापीठात २२ ते २८ ऑगस्ट, बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, पिलानी, गोवा कॅम्पस येथे ५ ते ११ सप्टेंबर, मंगलोर विद्यापीठ, मंगलोर, कर्नाटक येथे २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, केरळ विद्यापीठ, केरळ येथे १० ते १६ ऑक्टोबर, आयआयटी, इंदूर येथे ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर, उत्तर बंगाल विद्यापीठ, दार्जिलिंग येथे १४ ते २० नोव्हेंबर नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे ५ ते ११ डिसेंबर या काळात प्रशिक्षण कार्यक्रम होतील. प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सोनकवडे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

20 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्तुति'मुळे विद्यापीठाच्या लौकिकात भर

> शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंत विद्यापीठाच्या जडणघडणीमध्ये या विद्यापीठाचे नाव मोठे करण्यामध्ये बऱ्याच वरिष्ठ मंडळींचा तसेच आजी-माजी विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यापीठातील तरुण प्राध्यापकांनी हा वारसा पुढे सुरू ठेवला आहे. देशभरात हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विविध आय.आय.टी., केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठांकडून स्वीकृती मिळणे, ही विद्यापीठासाठी सन्मानाची बाब आहे.
>
> - प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर, ता. १९ : केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने स्तुति (सिनेजेस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम युटिलायजिंग द सायन्टीफीक अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) हा उपक्रम सुरू केला आहे. वैज्ञानिक उपकरणे आणि विश्लेषणात्मक तंत्रज्ञान याबाबत जागृती व्हावी. वैज्ञानिक संसाधनांचा देशभर विस्तार व्हावा हा यामागील उद्देश आहे. हा उपक्रम राबवण्यासाठी देशातील नामांकित संस्थांची निवड केली असून, यामध्ये विद्यापीठाच्या सुविधा केंद्राचाही समावेश आहे. याअंतर्गत सुमारे ८ लाख ८३ हजार ५०० रुपये इतकी रक्कम हस्तांतरित केली आहे, अशी माहिती सुविधा केंद्राचे अधिविभागप्रमुख प्रा. डॉ.आर.जी.सोनकवडे यांनी दिली. डॉ.सोनकवडे यांच्या प्रयत्नातून हा प्रकल्प विद्यापीठाला मिळाला आहे.



विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातील माहितीनुसार, 'महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान, झारखंड, दिल्ली आणि चंदीगड यांना या उपक्रमासाठी निधी मिळालेला आहे. यापैकी केवळ शिवाजी विद्यापीठ हे असे केंद्र आहे ज्याच्या सहयोगाने या प्रकल्पाकरिता आतापर्यंत १४ विविध संस्थांनी स्तुति कार्यक्रम घेण्याची तयारी दर्शवली आहे. स्तुति प्रकल्पाअंतर्गत शिवाजी विद्यापीठ ग्रामीण भागातील कॉलेजमधील विद्यार्थी व इतर विद्यापीठात मधील विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील आहे. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहभागी पात्रता निकष निश्चित केले आहेत. व्यक्ती मूळ भारतीय वंशाचा असावा. किमान शैक्षणिक पात्रता-पदव्युत्तर पदवी (विज्ञान), बी.टेक.( टेक्नॉलॉजी) असावी. प्राध्यापक,संशोधक,पोस्ट डॉक्टरेट फेलो, संशोधन-विकास मध्ये सक्रिय सहभागी होणारे उद्योजक असावेत. यजमान संस्था वगळता इतर संस्थांकडून ३ पेक्षा जास्त व्यक्तींना प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी होता येणार नाही.

20 MAY 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीवनात वस्तुसंग्रहालये महत्त्वाची

## संयोगिताराजे : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : 'वस्तुसंग्रहालये प्रेरणादायी आहेत. प्रांतिक इतिहास जीवन मूल्ये उलगडून दाखविण्याचे हे एक प्रभावी माध्यम आहे. जीवन समृद्ध करण्यासाठी ही वस्तुसंग्रहालये महत्त्वपूर्ण असतात,' असे प्रतिपादन संयोगिताराजे छत्रपती यांनी केले. जागतिक वस्तुसंग्रहालय दिनानिमित्त ऑनलाइन व्याख्यानमाला आणि ऑफलाइन चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयातर्फे कार्यक्रम आयोजित केला आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. वस्तुसंग्रहालयातून प्रत्येक व्यक्तींना काही ना काही घेण्यासारखे असते. माणसाची सृजनशीलता जागृत राहावयाची असेल, तर माणसाला प्रश्न पडले पाहिजे. त्या प्रश्नांची जागृतता वस्तुसंग्रहालयातून मिळते. वि. स. खांडेकरांचे साहित्य हिरव्या शाईच्या पेनातील आढळते. यातून ते निसर्गप्रेमी असल्याचे जाणवते, असे संयोगिताराजे छत्रपती यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी जागतिक वस्तुसंग्रहालय दिनानिमित्त वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयातर्फे आयोजित ऑनलाइन व्याख्यानमाला, चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन संयोगिताराजे छत्रपती यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी रणधीर शिंदे, व्ही. एन. शिंदे, नीलांबरी जगताप, आदी उपस्थित होते.

यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, आदी उपस्थित होते.

पुढारी

## 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला

# केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहुरकर यांचे आज व्याख्यान



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत प्रसिद्ध विचारक, लेखक आणि केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहुरकर यांचे शुक्रवार, दि. २० मे रोजी सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक येथे व्याख्यान होणार आहे. 'भारत एक जागतिक महासत्ता' या विषयावर ते पुष्प गुंफणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे अध्यक्षस्थान भूषविणार असून, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे प्रमुख उपस्थित असणार आहेत.

उदय माहुरकर हे सध्या केंद्रीय माहिती आयुक्त म्हणून नवी दिल्लीत काम पाहत आहेत. केंद्रीय माहिती अधिकार न्यायालयाचे ते न्यायमूर्ती आहेत. केंद्रीय माहिती आयुक्तपदावर येण्यापूर्वी गेली ३३ वर्षे त्यांनी 'इंडिया टुडे' या नामांकित मासिकाचे राजकीय विश्लेषक म्हणून विशेष भूमिका बजावली आहे.

राजकीय विश्लेषक या नात्याने २००८ ते २०१० या कालावधीत 'इंडिया टुडे'मध्ये लिखाण करीत असताना त्यांनी स्वतःचा वाचकवर्ग निर्माण केला. अचूक राजकीय विश्लेषक, असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. त्यांनीच पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी येणार, असे विश्लेषण केले होते. ते अचूक ठरले.

या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# उदय माहूरकर यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांचे 'भारत : एक जागतिक महासत्ता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवारी (दि. २०) सायंकाळी ५ वा. येथील दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवनात व्याख्यान होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव, डॉ. योगेश जाधव हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

लोकमत

# 'विद्यार्थी विकास' नियुक्तीची प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालक नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत १६ जूनपर्यंत आहे. अर्जाची स्थळप्रत २७ जूनपर्यंत जमा करण्याची मुदत आहे. तीन वर्षांच्या कालावधीसाठी या संचालकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. दरम्यान, सध्या विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालकपदाचा प्रभारी कार्यभार डॉ. आर.व्ही. गुरव यांच्याकडे आहे.

सकाळ

# ३१ मेपर्यंत शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरण्याचे आवाहन

कोल्हापूर, ता. १९ : शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ करिता महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी परिपूर्ण अर्ज महाडीबीटी पोर्टलवर ३१ मेपर्यंत सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज नोंदणीचे प्रमाण वाढण्याकरिता प्रयत्न करावेत, तसेच जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा अर्ज भरला गेला आहे का, याची खात्री करावी.

लोकमत

# प्रथम वर्षाची परीक्षा ५ जूनपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी सत्रातील पदवी पातळीवरील सर्व पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील प्रथम आणि द्वितीय सत्राच्या परीक्षा ५ जून ते २४ जून दरम्यान ऑफलाइन स्वरूपात होणार आहेत.

महाविद्यालय पातळीवर परीक्षा होतील. पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला १५ मिनिटे याप्रमाणे तीन तासांच्या पेपरसाठी ४५ मिनिटे वाढवून मिळणार आहेत. दूर शिक्षण केंद्रातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन संबंधित प्राचार्य, समन्वयक, दूर शिक्षण केंद्राने करायचे आहे.